# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०९ जुलै, २०२४ / आषाढ १८, १९४६ ( शके )**

**मुख्यमंत्री :- यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

### मुंबई शहरात बनावट पॅथोलॉजी लॅबच्या माध्यमातून नागरीकांची होत असलेली फसवणूक

**(१) * ८११३२ श्री.सुनील राणे (बोरीवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेकडे सन २०१९ पासून ते आजतागायत अधिकृत पॅथोलॉजी लॅबच्या संख्येची नोंद नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच पॅथोलॉजी लॅबकडून आकारण्यात येणाऱ्या दरांमध्ये देखील मोठी तफावत असून यासाठी कोणतीही नियमावली ठरविण्यात आलेली नसल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिकृत पॅथोलॉजी लॅब घोषित नसल्यामुळे पॅथोलॉजीस्टचे नाव, स्वाक्षरी व शिक्का वापरुन मोठ्या प्रमाणात अनधिकृत व बनावट लॅब सर्रासपणे कार्यरत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन अनधिकृत लॅबवर नियंत्रण आणण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या तरतुदीनुसार पॅथॉलॉजी लॅब नोंदणीकृत करण्याची तरतूद नसल्याने लॅब नोंदणी करण्यात येत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील बेस्टच्या भंगार बस विक्रीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२) * ७९५३३ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्टच्या भंगार बस विक्रीच्या आकडेवारीत मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येत असून यात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेस्ट प्रशासनाकडे सन १९७१ ते २००७ या कालावधीतील भंगार विक्रीबाबतची कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार लपविण्यासाठी उक्त कागदपत्रे जाणूनबुजून गहाळ करण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) बेस्टच्या भंगार बस विक्रीची सन १९७१ ते २००७ पर्यंतची कागदपत्रे (रेकॉर्ड) बेस्ट उपक्रमाकडे उपलब्ध आहेत.
(३) भंगार बस विक्रीच्या आकडेवारीत कोणत्याही प्रकारची तफावत नसून कोणताही गैरव्यवहार झालेला आढळून आला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड शहरात नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेंतर्गत नियोजन आराखडयानुसार कामे न करता केलेला गैरव्यवहार

**(३)** * **८१४३५ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहरात नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेंतर्गत मा.जिल्हाधिकारी, बीड यांनी रक्कम रुपये ५,०५,७१,१५०/- इतका निधी मंजुर करुन शासनाचे आदेशानुसार काही अटी व शर्तींसह बीड नगरपालिकेकडे दिनांक १५ जानेवारी, २०२४ रोजी सदर योजना वर्ग करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना बीड नगरपालिकेकडे वर्ग करताना, शासनाच्या दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार, नगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांचे सर्वेक्षण करुन यादी तयार करणे, त्या भागातील रस्ते, मोकळ्या जागा व त्या भागासाठी पुरविण्यात आलेल्या सोईसुविधा याची सद्य:स्थिती दर्शविणारा तसेच नागरी सेवांची शासन मानके यानुसार नागरी सोईसुविधांचा आराखडा तयार करणे बीड नगरपालिकेस शासन आदेशानुसार बंधनकारक होते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असतांना, बीड नगरपालिकेने, कोणताही विकास आराखडा तयार केलेला नसल्याचे व त्यामुळे नागरी दलितेत्तर वस्तीमध्ये तेथील वस्तीच्या नियोजन आराखड्यानुसार कामे न करता, प्रभाग क्र. १४, १६ व २१ मध्ये सहा महिन्यापुर्वी व त्याअगोदरच अस्तित्वात असलेली कामे पुन्हा केल्याचे दर्शवून निधीमध्ये गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रान्वये, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना तक्रार निवेदन सादर करुनही आजपावेतो याप्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे,

बीड शहरात नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेअंतर्गत रुपये ८,०५,७१,१५०/- इतक्या रकमेच्या एकूण १९ कामांना जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि.१५ जानेवारी, २०२४ रोजीच्या आदेशान्वये मंजूरी देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही,

बीड नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित कामे दि.०८ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार करण्यात आली असून, नगरपरिषदेच्या विकास आराखड्याशी सुसंगत आहेत. तसेच प्रस्तावित करण्यात आलेली कामे यापूर्वी झालेली नाहीत.

(४) अंशतः खरे आहे,

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.३० जानेवारी, २०२४ रोजीचे जिल्हाधिकारी, बीड यांना निर्देशित व विभागास पृष्ठांकीत करण्यात आलेले निवेदन प्राप्त झाले आहे.

(५) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारीच्या अनुषंगाने बीड नगरपरिषदेने शहरातील नागरिक, लोकप्रतिनिधी व पालकमंत्री यांच्या मागणीच्या अनुषंगाने सर्व बाबींचा विचार करुन आवश्यकतेनुसार कामे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केली असल्याचे स्पष्ट केले असून जिल्हाधिकारी, बीड यांनी दि. २६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालावर आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोरिवली (मुंबई) येथील भगवती रुग्णालयाच्या विस्ताराचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(४) * ८४३३८ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या भगवती रुग्णालयाच्या विस्ताराचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून सदर कामात कंत्राटदाराने अनेक अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याची बाब माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. बोरीवली येथील भगवती रुग्णालयामध्ये अद्ययावत सुसज्ज असे तळघर + तळमजला + आठ मजले व सर्व्हिस मजल्यासह ४९० रुग्णशय्या असलेल्या विस्तारीत मुख्य इमारतीचे काम दिनांक ०१.०८.२०१९ रोजी सुरु करण्यात आले आहे.

हे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने नेमून दिलेल्या अटी व शर्तींनुसार करण्यात येत असून सदर काम निकृष्ट दर्जाचे आढळून आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात बनावट कागदपत्रांच्या आधारे वाहन नोंदणी करुन केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(५) * ८११८१ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र विशेषत: अंधेरी, वाशी, वसई, अमरावती, पुणे इत्यादी अनेक प्रादेशिक परिवहन कार्यालयात बनावट कागदपत्रांच्या आधारे मोठ्या प्रमाणात वाहनांची बेकायदेशीररित्या नोंदणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परराज्यात बँकांनी लिलावात काढलेली, भंगारातील आणि आयुर्मान संपत आलेली तसेच चोरीची वाहने बनावट ना-हरकत प्रमाणपत्राच्या आधारे महाराष्ट्रात नोंदणी विक्री तसेच रस्त्यावर चालविली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रादेशिक परिवहन अधिकारी व कर्मचारी यांच्या आर्थिक संगनमताने बनावट कागदपत्रांच्या आधारे आरटीओच्या पोर्टलवर रीतसर नोंदणी करून मोठ्या प्रमाणात उक्त गैरव्यवहार करण्यात येत असून त्यात शासनाच्या महसूलाचे देखील नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापैकी बहुतांश वाहनांची मुळ कागदपत्रे गहाळ झाली असल्याचे तसेच वाहनांच्या नोंदणीसाठी वापरण्यात येणाऱ्या "वाहन" या संगणकीय यंत्रणेवर सुध्दा ही माहिती उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनेक ठिकाणी पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार नोंदविण्यात आल्या असून केवळ अंधेरी येथील लिपिकाला कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून अन्य दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच खाजगी ट्रॅव्हल बसची परराज्यातील प्रादेशिक परिवहन विभागाकडे नोंदणी करून महाराष्ट्रात बेकायदेशीररित्या ट्रॅव्हलिंगचा व्यवसाय करण्यात येत असल्याचे पुणे आरटीओच्या भरारी पथकाने माहे मे, २०२४ च्या सुमारास केलेल्या कारवाईत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची राज्यभरात पसरलेली व्याप्ती पाहता याची सखोल चौकशी करुन सर्व संबंधितांवर तसेच दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

परिवहन आयुक्त कार्यालयाच्या अहवालानुसार या प्रकरणी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

अ) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) येथे तेलंगणा राज्याचे ना हरकत प्रमाणपत्र नसताना बनावट कागदपत्रांच्या आधारे एकूण ८६ वाहनांची पुनर्नोंदणी करून घेतल्याची बाब जानेवारी २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे.

ब) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई कार्यालयाच्या वायुवेग पथकाद्वारे वाहनांची नियमित तपासणी करत असतांना त्यांना ४ वाहनांच्या चेसीस व इंजिन क्रमांकामध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास आले. सदर वाहनाच्या कागदपत्रामध्ये अनियमितता आढळून आल्याने पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

क) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसईच्या अभिलेखावरील सर्व वाहनांचा आढावा घेतला असता अरुणाचल प्रदेश राज्यातून ट्रान्सफर होऊन पुनर्नोंदणी झालेल्या एकूण ६० वाहनांच्या चेसिस व इंजिन क्रमांकामध्ये विसंगती आढळून आली. त्यामुळे सर्व ६० वाहनांची नोंदणी रद्द करण्यात येऊन संबंधीतांविरुध्द पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ड) प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती या कार्यालयात एकूण २३ वाहनांची चुकीच्या पध्दतीने पुनर्नोंदणी झाल्याची प्रकरणे निर्दशनास आले आहे. त्यापैकी १६ वाहनांची नोंदणी रद्द करण्यात आली असून उर्वरित ७ वाहनांची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

इ) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्यालयात बनावट कागदपत्रांच्या आधारे वाहनांची पुनर्नोंदणी झाल्याचे प्रकरणे तपासण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

फ) प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामीण) या कार्यालयात १९ वाहने बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणीकृत झाले असल्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक, विशेष तपास पथक, गुन्हे शाखा नवी मुंबई यांचे दि.३१/०५/२०२४ रोजीच्या पत्राद्वारे परिवहन आयुक्त कार्यालयास कळविले आहे.

(३) बनावट कागदपत्राच्या आधारे परराज्यातील वाहने पुनर्नोंदणी केल्याप्रकरणी आंबोली पोलिस ठाणे, अंधेरी, सानपाडा पोलिस स्टेशन, नवी मुंबई, विरार पोलिस ठाणे येथे गुन्हे दाखल केले आहेत.

तथापि, वाहन ४.० या संगणकीय प्रणालीवर संबंधित वाहनांचे शुल्क व देय कर पुर्ननोंदणीच्या वेळेस घेण्यात आले आहे.

(४) अंशत: खरे आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी, मुंबई (पश्चिम) येथील बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी झालेल्या कोणत्याही वाहनाचे कागदपत्रे उपलब्ध नाहीत. तसेच इतर कार्यालयांमध्ये काही वाहनांच्याबाबत कागदपत्रे गहाळ झाली आहेत. तथापि, याबाबत तपासणी सुरु आहे.

(५) प्रादेशिक परिवहन कार्यालय (पश्चिम) येथील सकृत दर्शनी दोषी असलेले ०४ कर्मचारी यांचे निलंबन करण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तर ०१ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशीची बाब कार्यवाहीखाली आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथील ०१ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी व ०२ मोटार वाहन निरिक्षक यांच्या निलंबन व विभागीय चौकशीचा प्रस्ताव कार्यवाहीखाली आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर ग्रामीण येथील सकृत दर्शनी दोषी असलेल्या ०५ कर्मचारी यांचे निलंबन करण्यात आले असून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तर ०१ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी व ०२ मोटार वाहन निरिक्षक यांच्या निलंबन व विभागीय चौकशीचा प्रस्ताव कार्यवाहीखाली आहे.

(६) प्रादेशिक परिवहन कार्यलय, पुणे येथील वायुवेग पथकामार्फत सर्व प्रकारच्या वाहनांची तपासणी करण्यात येत असून सदर पथकाकडून परराज्यातील बसेसवर कारवाई केली आहे. सदर कारवाईत सन २०२४-२५ या कालावधीत २२० दोषी वाहनांकडून रु.२५.८२ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(७) सदर प्रकरणी प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपासणी पथक गठीत केले असून त्यांच्या मार्फत प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) व प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामीण) येथील प्रकरणांच्या चौकशीचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे.

राज्यातील सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात परराज्यातून दि.०१.०१.२०१९ ते आजतागायत नोंदणीसाठी (RMA) वाहनांची तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याचप्रमाणे इतर राज्यातील वाहनांची हस्तांतरण / पत्ताबददल प्रक्रियेचा पुर्नआढावा घेवून विविध कार्यालयातील संबधित दोषी कर्मचारी व अधिकारी यांच्या विरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तर काही प्रकरणी निलंबन व विभागीय चौकशीची बाब कार्यवाहीखाली आहे.

-----------------

**ग्रँट रोड (मुंबई) येथील 'डी' प्रभागातील लकडा बाजार येथे लागलेल्या आगीबाबत**

**(६) * ८०७७८ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रँट रोड (मुंबई) येथील 'डी' प्रभागातील लकडा बाजार येथे दिनांक २५ व २६ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री भीषण आग लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भीषण आगीत एका ५० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला असून सदर आग विझविण्याकरिता तब्बल १८ तासांचा कालावधीत लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आगीसंदर्भात सखोल चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन मृत व जखमींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर आगीच्या दुर्घटनेचा तपास बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रमुख अग्निशमन अधिकारी यांचेमार्फत करण्यात आला आहे.

सदर घटना नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने मृत व्यक्तीच्या वारसाला व नुकसानग्रस्त व्यक्तींना आर्थिक मदत अदा करण्यासंदर्भातील धोरण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईमध्ये बालमृत्यू टाळण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(७) * ८०६४६ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात आरोग्य सुविधा परिपूर्ण असतांना देखील सन २०२३ मध्ये येथे जन्मलेल्या ५ वर्षाखालील १००० पैकी २६ मुलांचा मृत्यू होत असल्याची बाब दिनांक २२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांच्या अनुसार मुलांच्या मृत्यूचे कारण मुदतपुर्व प्रसूती, न्युमोनिया, पिलिया, मातेचे कुपोषण गर्भामधील व्यंग, हृदयविकार अनुवंशिक आजार व अन्य इन्फेक्शन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन बालमृत्यू टाळण्यासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कुपोषित माता व कमी वजनाच्या बालकांच्या नियंत्रणासाठी पुर्व तपासणी, प्रसुती व प्रसुती पश्चात तपासणी यांवर अधिक भर देण्यात येत आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राज्य शासनाच्या प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान व इतर विविध योजना राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात निर्माण झालेल्या पाणी टंचाईबाबत

**(८) * ८०३९३ श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे शहरी भागात होत असलेल्या कमी पाणी पुरवठ्यामुळे तेथे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून लाखो रुपये खर्च करुन टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकवासला (जि.पुणे) येथील धायरी भागातील १८, नऱ्हे भागातील १३, बावधन-भुसारी कॉलनी मधील १५ आणि बालाजी नगर, धनकवडी, नांदेड, खडकवासला, किरकटवाडी, नांदोशी भागातील सोसायट्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई असून पाणीपुरवठा देखील विस्कळीत झाला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पिसोळी गाव (ता.हवेली, जि.पुणे) व जेजूरी (जि.पुणे) येथे नगरपालिकेकडून आठवड्यातून एकदाच पाणीपुरवठा होत असल्याने खाजगी टँकरद्वारे पैसे मोजून देखील स्थानिक रहिवाशांना पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच फुरसुंगी येथे पालिकेचा कचरा-डेपो असल्यामुळे येथील पाण्याचे स्त्रोत खराब झाले असून बोअरवेलच्या पाण्यामध्ये क्षार जास्त प्रमाणात असून हे पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे शहरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी अतिरिक्त पाण्याचा कोटा मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पुणे शहरातील पाणीटंचाई तात्काळ दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) पिसोळी गाव (ता.हवेली, जि.पुणे) पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झाले असून सद्य:स्थितीत सदर गावामध्ये दैनंदिन १८ टँकर खेपाद्वारे पाणी पुरवठा केला जातो. जेजूरी (जि.पुणे) नगरपरिषदेस तहसिल कार्यालय पुरंदर, जि.पुणे यांच्या मार्फत टँकरद्वारे तसेच नगरपरिषद, खाजगी व मार्तंड देवस्थान या संस्थेमार्फत पाणीपुरवठा केला जात आहे.

(४) हे खरे आहे.

(५) पुणे महानगरपालिकेने नवीन समाविष्ट ३४ गावांचा विचार करून २३.३४ टी.एम.सी.पाणीसाठा आरक्षित करण्याची मागणी केली आहे. तथापि, जलसंपदा विभागामार्फत सन २०२३-२४ करीता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या मापदंडानुसार १२.८२ टी.एम.सी. पाणीवापर अनुज्ञेय असून तेवढे मंजूर करण्यात आले आहे.

(६) पाणी टंचाई तात्काळ दूर करण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून अल्पकालीन व दिर्घकालीन उपाययोजना करण्यात येत आहेत.

-----------------

## पुणे शहरातील मुंढवा येथे सांडपाणी शुद्ध करुन पाणी शेतीयोग्य करण्याकरीता उभारण्यात आलेल्या जॅकवेल प्रकल्पाबाबत

**(९) * ८२२२३ ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील मुंढवा येथे सांडपाणी शुद्ध करुन ते नदीत सोडून सदरहू पाणी शेतीला वापरायोग्य करण्यासाठी सुमारे १८० कोटी रुपये खर्च करुन उभारलेल्या जॅकवेल प्रकल्पाद्वारे पाणी शुद्धीकरण होत नसल्याने सदरहू प्रकल्प विनावापर पडून असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात तयार होणारे सांडपाणी महानगरपालिकेमार्फत शुद्ध न करता थेट नदीपात्रात सोडल्याने व ही बाब जलसंपदा विभागाच्या अटी व शर्तीमध्ये बसत नसल्याने जलसंपदा विभागाने यासाठी मोठ्या प्रमाणात दंड आकारलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पुणे महानगरपालिका प्रशासनाने पाणी वापराचे देयक रुपये १११ कोटी असून जलसंपदा विभागास सांडपाण्याचा दंड रुपये ९३ कोटी भरावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशुध्द पाणी पुरवठ्यामुळे पुणे शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. तथापि, मुंढवा जॅकवेल येथून शेतीसाठी सांडपाणी पंपिंग केले जाते. येथे सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. एस. टी.पी. कडून प्रक्रिया केलेले सांडपाणी नदीत सोडण्यात

येते व हे पाणी मुंढवा जॅकवेल येथून शेतीसाठी पंपिंग केले जाते. या पाण्याची वेळोवेळी तपासणी केली जाते. पाटबंधारे विभागाच्या मागणीनुसारच मुंढवा जॅकवेल येथून शेतीसाठी पाणी पंप केले जाते. माहे एप्रिल २०२४ मध्ये पाणी पंप केले असून माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्यादरम्यान प्रकल्प विनावापर पडून असल्याची बाब खरी नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सांडपाण्याचा दंड कमी करण्याच्या दृष्टीकोनातून पुणे शहरातील जून्या हद्दीमध्ये जायका प्रकल्प निधी व पुणे मनपा निधी मधून ४०६ दशलक्ष लिटर्स व नव्याने समाविष्ट ११ गावांमध्ये पहिल्या टप्प्यात १२ दशलक्ष लिटर्स क्षमतेच्या मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांची उभारणी करणेचे काम सुरु आहे. नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये २०१ दशलक्ष लिटर्स क्षमतेच्या मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. त्यामुळे नदीमधील प्रदूषण मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेच्या डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयात बालरुग्णांचा झालेला मृत्यू

**(१०) * ८३०२३ ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयात तीन वर्षापूर्वी तयार करण्यात आलेल्या बालरुग्ण कक्षासाठी बालरोगतज्ञासह डॉक्टर व नर्सिंग स्टाफ उपलब्ध नसल्याने १ कोटीहून अधिक किंमतीची पेडियेट्रीक व्हेंटीलेटर इन्क्यूबेटर, डबल सरफेस फोटो थेरपी यंत्रणा वापराविना पडून असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बालरुग्ण कक्ष सुरु नसल्याने तसेच बालरुग्णांना वेळेत उपचार न मिळाल्याने माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान दोन बाळांचा व एक रेबीज वर उपचार घेत असलेल्या बाळाचा मृत्यू झाल्याची गंभीर बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील रुग्णालयातील बालरुग्ण कक्षात तज्ञ डॉक्टरांच्या नेमणुकीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून त्यास अद्यापपर्यंत मान्यता दिली नसल्याने बालरुग्ण कक्षासाठी खरेदी केलेले व स्थापित केलेल्या साहित्याची मुदत संपल्याने शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कंत्राटी सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत

**(११) * ७९८३६ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कंत्राटी सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची सुमारे २२८ कोटी रुपये रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा केली जात नसल्याने सदरची रक्कम तात्काळ जमा करण्यात यावी असे आदेश विभागीय आयुक्तांनी माहे जानेवारी, २०२४ मध्ये महानगरपालिकेस दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील १५ हजाराहून अधिक कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन रोखल्याने सफाई कामगारांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आल्यामुळे या कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन तात्काळ अदा करून ज्या त्रुटी आहेत त्याचे निराकरण करण्यासाठी राज्य शासनाने मनपा प्रशासनाला आणि लेखा विभागाला सूचना केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) तसेच नवी मुंबई महानगरपालिकेने कोरोना काळात कंत्राटी कामगारांची १८ महिन्यांची रक्कम त्यांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कंत्राटी सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम जमा करणे, सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात कोरोना काळातील व सद्य:स्थितीत एकूण २९६६ दैनंदिन साफसफाई कंत्राटी कामगार आहेत. सदर कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीचा भरणा करण्यात आलेला आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कंत्राटी सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची अंशत: रक्कम कंत्राटी संस्थांनी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेकडे जमा केली आहे.बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कंत्राटी सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेबाबत विभागीय आयुक्तांनी देय भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेचे केलेले परिगणनेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालय येथे रिट याचिका क्र. ५५३/२०२४ दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १५ हजारांहून अधिक कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पॅनकार्ड आधारकार्डशी लिंक नसल्यामुळे आयकर विभागाद्वारे परस्पर आयकर कपात करण्यात आली असल्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन खाती जमा झाले नाही. त्यापैकी ६८०० कार्यरत कामगार / कर्मचारी हे घनकचरा विभागातील असून त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागू नये याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अशा कर्मचाऱ्यांना रु.१५,०००/- इतक्या आगाऊ रकमेचे अधिदान त्वरीत अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेने विविध कामात कंत्राटदारांना आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम वसूल केली नसल्याबाबत

**(१२) * ८०२८५ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने विविध कामात कंत्राटदारांना २०० कोटीहून अधिक रक्कमेचा ठोठावण्यात आलेला दंड अद्यापही वसुल करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई महानगरपालिकेकडे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच मुंबई महानगरपालिकेमध्ये अनेक वादग्रस्त अधिकारी कार्यरत असून त्यांचे कंत्राटदारांशी संगनमत असून त्यांनी कोट्यवधी रुपयांच्या निविदांची कंत्राटे त्यांना दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन दंडाची वसुली करणेबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंता विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध कामांत सन २०२२-२३ मध्ये कंत्राटदाराकडून रु.१.६२ कोटी व सन २०२३-२४ मध्ये रु.२.१९ कोटी इतका दंड बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वसूल करण्यात आला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्प विभाग, यांत्रिकी व विद्युत विभाग, मलनि:सारण प्रचलन व मलनि:सारण प्रकल्प या विभागांकडून विविध कामांत कंत्राटदारांना ठोठावलेल्या दंडाची रक्कम वेळोवेळी वसूल करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूल विभागाच्या सन २०२३-२४ मध्ये विविध कामांत कंत्राटदारांना रु.७७.९९ लक्ष इतक्या रकमेपेक्षा अधिक रकमेचा दंड ठोठावण्यात आला असून, त्यापैकी आतापर्यंत रु.७३.३९ लक्ष इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली असून दंडाची उर्वरित रक्कम कंत्राटदाराच्या पुढील अधिदानातून वसूल करण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागामार्फत सुरु असलेल्या सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांच्या ५ निविदांतील कंत्राटदारांना विविध कारणांसाठी शहर विभागात रु.६४.६० कोटी, पश्चिम उपनगरात रु.२३.३६ कोटी व पूर्व उपनगरात रु.२३.३० कोटी इतका दंड ठोठावण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर दंडाची रक्कम कंत्राटदारांच्या देयकांमधून वसूल करण्यात येत आहे. तसेच, शहर विभागातील दंड वसूल करण्याबाबत लवादाकडे सुनावणी सुरु आहे. लवादाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमोचित कारवाई करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे संगमेश्वर (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील भूखंडावर बेकायदेशीर व्यावसायीक इमारतीचे केलेले बांधकाम

**(१३)** * **८४२३६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे संगमेश्वर (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील सर्व्हे क्र.२३८/१ ते ५, न.भू.क्र. ९६-१०० या एकत्रित दोन एकराच्या भूखंडावर सर्वश्री संभाजी अहिर व कमलाकर पवार या जमीन मालकांनी आयुक्त, मालेगांव महानगरपालिका यांच्या संगनमताने बेकायदेशीररित्या प्लान मंजूर करुन तीन मजली व्यावसायिक इमारतीचे बांधकाम करुन प्रती गाळा ४० लाख रुपये प्रमाणे १५६ गाळयांची विक्री करुन कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली ५० वर्षापासून उक्त भूखंडावर वास्तव्य करणाऱ्या ५० कब्जेदार अनिवासी कुटुंबांनी महानगरपालिकेस व मालकास नियमित भाडे व देय रक्कम अदा केली असतानाही सदरहू भाडेकरु कुटुंबियांना नविन इमारतीत गाळे न देता भाडेकरु कुटुंबांना बेघर व बेदखल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कब्जेदार भाडेकरुंनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केलेल्या तक्रारीवर मंत्री महोदयांनी सुनावणीत एमआरटीपी अँक्ट १९६६ चे कलम ४७ अन्वये दि.२३.११.२०१५ रोजी दिलेल्या निर्णयात महानगरपालिकेने कब्जेदार भाडेकरु वापरत असलेले न्यायप्रविष्ठ क्षेत्र बांधकाम प्रकल्पातून वगळून उर्वरित क्षेत्रावर बांधकाम करण्याचे आदेश दिले असताना त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन सदरहू भाडेकरुंना न्याय देणेबाबत तसेच यातील दोषी जमिनधारक, विकासक व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही,

आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव यांनी दि.१८.०६.२०२४ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार,

"प्रकरणी प्रथमतः अं.भू.क्र ९६ ते १०० या Amalgamated मिळकतीवर मालेगाव महानगरपालिकेने दि.१६. जानेवारी २०१४ रोजी बांधकाम परवानगी दिली होती. सदर जागेवरील कब्जेदार/भाडेकरू यांच्या विविध तक्रारी प्राप्त झाल्याने मालेगाव महानगरपालिकेने सदर बांधकाम परवानगीस दि.०२.०८.२०१४ रोजी स्थगिती दिली आहे.

त्यावर जमीनधारक श्री.कमलाकर शंकर पवार यांनी शासन नगर विकास विभागाकडे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४७ अन्वये दाखल केलेल्या अपिलावर तत्कालीन मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.२३.११.२०१५ रोजी सुनावणी घेण्यात आली व दि.निरंक. .०२.२०१६ रोजी "सदर प्रकरणी मालेगाव महानगरपालिकेने न्यायप्रविष्ठ क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्रावरील सुधारित बांधकाम नकाशे प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीस अधीन राहून मंजूर करावेत" असा निर्णय पारीत केलेला आहे. सदर निर्णयात न्यायप्रविष्ठ क्षेत्राची मोजणी करण्याचे कोणतेही स्पष्ट आदेश नाहीत. नगर भूमापन कार्यालयाकडून ०५/२०१४ मोजणी, दि.१२.०८.२०१४ व मो.र.नं११०/२०१४, मोजणी दि.२१.०७.२०१४ रोजीच्या मोजणी नकाशाच्या आधारे उक्त मोजणी नकाशावर दर्शविलेली बांधकामे विचारात घेऊन मालेगाव महानगरपालिकेने अं.भू.क्र.९६-अ वर पत्र क्र ३१८ दि.१८.०८.२०१८ अन्वये Commercial Complex करिता सुधारित परवानगी दिली आहे. येथे नमूद करण्यात येते की, जागेवरील बांधकामे दि.१८.०८.२०१८ रोजीच्या मंजूर बांधकाम नकाशामध्ये दर्शविण्यात आलेली आहेत. तथापि, नव्याने मोजणी नकाशा सादर झालेला दिसून

येत नाही. अर्जदार यांनी दि. २०.०६.२०१८ च्या पत्रान्वये प्रकरणातील मुद्द्यांचा खुलासा सादर केला आहे. सदर इमारत ही खाजगी स्वरुपाची आहे. सदर इमारतीची खरेदी विक्री करण्याचे अधिकार मालेगाव महानगरपालीकेस नाहीत. त्यामुले मालेगाव महानगर पालिकेच्या संगनमताने १६५ गाळयांची विक्री करुन कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या प्रश्नच उद्भवत नाही".

(२) नाही,

आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव यांनी दि.१८.०६.२०२४ अन्वये सादर अहवालातील मुद्दा क्र.२ नुसार, "सदर जागेवरील भाडेकरू / कब्जेदार यांचे स्थानिक दिवाणी न्यायालयात जागेसंदर्भात दावे दाखल आहेत. तसेच मा.उच्च न्यायालयात भाडेकरू / कब्जेदार यांनी रिट याचिका दाखल केल्या आहे, आज रोजी जागेवरील कब्जेदार / भाडेकरू यांची बांधकामे जैसे थे परिस्थितीत असून अद्यापही बेघर / बेदखल करण्यात आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. सदर जागा खाजगी असून मालेगाव महानगरपालिकेची जागा नाही. सबब, मालेगाव महानगरपालिकेने येथील कब्जेदार / भाडेकरू यांचेकडुन भाडे वसूल करण्याचा प्रश्नच उदभवत नाहीत. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात उक्त प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल."

(३) नाही,

मालेगांव महानगरपालिका यांनी दि.१८/०६/२०१४ च्या पत्रान्वये सादर अहवालानुसार जमिनधारक श्री.कमलाकर शंकर पवार यांनी कलम ४७ चे तरतूदीन्वये शासनाकडे दाखल अपिलावर दि.निरंक. ०२.२०१६ रोजीच्या निर्णयान्वये, 'सदर प्रकरणी मालेगाव महानगरपालिकेने न्यायप्रविष्ट क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्रावरील सुधारित बांधकाम नकाशे प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीस अधिन राहून मंजूर करावेत,' असे महानगरपालिकेस कळविण्यात आलेले होते. सदर निर्णयात न्यायप्रविष्ठ क्षेत्राची मोजणी करण्याचे कोणतेही स्पष्ट आदेश नाहीत. तथापि जागेवरील परिस्थितीनुसार तक्रारदार/न्यायप्रविष्ठ क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्रावरच बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. किबंहुना कब्जेदार/भाडेकरू याचे बांधकामाखालील क्षेत्र आज देखील अबाधित आहेत.

(४) व (५) सदर प्रकरणी, मा.उच्च न्यायालय व दिवाणी न्यायालयात रिट याचिका व दावे दाखल असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. संबंधित भाडेकरु / कब्जेदार व जमिनधारक यांना आपले म्हणणे मा.उच्च न्यायालय तसेच दिवाणी न्यायालयात मांडण्याची पूर्ण मुभा आहे.

शासनाने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आदेश केले आहेत. त्यानुषंगाने शासनाने पत्र क्र. टिपीएस-११२२/१७४७/प्र.क्र.४३/२०२३/नवि-०९, दि.२६.०४.२०२३ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र, राज्य, पुणे यांचे अभिप्राय अपेक्षिले असता, नगर रचना संचालनालयाकडील पत्र क्र.३४०६, दि.२९.०६.२०२४ अन्वये वस्तुस्थितीनुरुप अहवाल अभिप्रायासह सादर केला आहे. त्यास अनुसरुन प्रस्तूत प्रकरण शासन स्तरावर कार्यवाहीत आहे.

-----------------

## शांतीधाम (जि.नांदेड) येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गतची कामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत

**(१४) * ८२२६४ श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शांतीधाम (जि.नांदेड) येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतंर्गत स्मशानभूमी व परिसर आधुनिक पध्दतीने विकसित करण्याबाबत ८ कोटी ५८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गॅस दाहिनीच्या मनोऱ्याच्या आधुनिकीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याने, उक्त दाहिनी कोसळण्याच्या स्थितीत असल्याची बाब माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील, गोवर्धन घाट, (शांतीधाम) येथील स्मशानभूमी व परिसर आधुनिक पध्दतीने विकसित करणेकरिता रु.८,५७,६२,५४९/- रुपयांच्या रक्कमेच्या कामास जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या दिनांक २३.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरील कामांसाठी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका यांचेकडून प्रकल्प व्यवस्थापक म्हणून डी.ए.स्टुडिओस, प्रा.लि.हैद्राराबाद यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरील कामे प्रगतीपथावर असताना प्रकल्प व्यवस्थापक डी.ए.स्टुडिओस, प्रा.लि.हैद्राराबाद यांनी पाहणी करुन गॅस दाहिनीचे मनोरा (शियर वॉल) S-१० चे बांधकाम (शियर वॉल) S-११ च्या समांतर नसल्याचे त्यांच्या दि.५.१२.२०२३ च्या अहवालामध्ये नमूद केल्याने सदर शियर वॉल क्र.S-१० पाडणे नियोजित होते. त्यामुळे कंत्राटदाराने सदर शियर वॉल क्र.S-१० दि.११.४.२०२४ ते दि.१३.४.२०२४ दरम्यान पाडून घेतलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांगातपाडा (ता.तलासरी, जि.पालघर) येथील गोपाल फेरस कंपनीतून निघणाऱ्या विषारी धुरामुळे होणारे प्रदूषण रोखण्याबाबत

**(१५) * ७९५२५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगांव (ता.तलासरी, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील मांगातपाडा येथील गोपाल फेरस कंपनीतून दररोज निघणाऱ्या विषारी धुरामुळे प्रचंड वायु प्रदूषण होऊन गावकऱ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीच्या विरोधात जिल्हाधिकारी, पालघर यांच्या समक्ष झालेल्या जनसुनावणी दरम्यान वायुप्रदूषण रोखण्याबाबत विविध अटी व शर्तींचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आलेले असतानाही सदर कंपनी व्यवस्थापनाकडून कोणत्याही प्रकारच्या अटी व शर्तींचे पालन केले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीद्वारे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वायु प्रदूषणामुळे आसपासच्या परिसरातील गावकऱ्यांना श्वसनाचा त्रास होत असून झाडे व पिकांवरही त्याचा परिणाम होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे करुन देखील कंपनीवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाचे चौकशी करुन प्रदूषण रोखणेबाबत तसेच संबंधित कंपनी व सदर प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, दि. १०.०७.२०२३ रोजी मा.जिल्हाधिकारी समक्ष झालेल्या जनसुनावणी दरम्यान उद्योगाने दिलेल्या सादरीकरणानुसार उत्पादन प्रकियेतून निघणाऱ्या धुळीकणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी बॅग फिल्टर आणि ३० मीटर उंचीचे धुरांडे बसविले आहे.

(३) हे खरे नाही.

अ) श्वसनाच्या त्रासाबाबत व वायुप्रदूषणामुळे पिकांवरील परिणामांबाबतच्या तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ या कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

ब) तालुका कृषी अधिकारी, तालुका तलासरी यांच्या दि. ३१.०५.२०२४ रोजीच्या अहवालानुसार कंपनीद्वारे होणाऱ्या वायु प्रदूषणामुळे पिकांवर परिणाम होऊन नुकसान होत असल्याबाबत कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेली नाही.

क) जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांच्या दि. ३१.०५.२०२४ रोजीच्या अहवालानुसार तलासरी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आमगांव अंतर्गत मौजे आमगांव येथील सन २०२३-२४ या वर्षात ताप, सर्दी, खोकला, दमा व इतर आजाराच्या रुग्णांमध्ये विशेष वाढ झालेली आढळुन येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### लाड समितीच्या शिफारशीनुसार वाल्मिकी, मेहतर व भंगी समाजास वारसा हक्क देण्याबाबत

**(१६) * ८२४८७ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार लाड समितीच्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या संदर्भातील अंमलबजावणीबाबत सुधारीत तरतूदी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच औरंगाबाद खंडपीठाने यासंदर्भात दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी दिलेल्या निर्णयात वाल्मिकी, मेहतर व भंगी समाजास वारसा हक्कासंदर्भातील सवलत देण्यात आली असून याप्रकरणी शासनाने देखील उक्त समाजास विशेष प्राधान्य (सवलत) देण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाड समितीच्या शिफारशीसंदर्भात सुधारित तरतुदीतील मुद्दा क्र.८.४ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित कार्यालयाने वारसाचे जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे अनिवार्य केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून (प्रशासक) वारसा हक्क प्रकरणातील पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यास विलंब केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाच्या विविध विभागांतर्गत वाल्मिकी, मेहतर व भंगी समाजास वारसा हक्क देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
शासन शुद्धिपत्रक दि.११.०३.२०२४ अन्वये नियुक्ती देण्यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
(४) हे,खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडकवासला (जि.पुणे) येथील परिसरातील नालेसफाईची कामे केली नसल्याबाबत

**(१७) * ७९४०४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला (जि.पुणे) येथील धायरी, नऱ्हे, बावधन-भुसारी कॉलनी, बालाजी नगर, धनकवडी, वारजे माळवाडी व सिंहगड रोड परिसरातील पावसाळ्यापुर्वीची नालेसफाईची कामे पुर्ण क्षमतेने केली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सर्व भागांमध्ये असणाऱ्या नाल्यांची अत्यंत दूरवस्था झाली असून नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, कचरा व राडारोडा पडला असून पावसाळ्यात नाल्यांमध्ये पाण्याचा प्रवाह वाढल्याने नाल्यांचे सांडपाणी रस्त्यावर येऊन नागरी वस्तीमध्ये शिरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागासाठी नालेसफाईच्या कामाकरीता निविदा काढून कंत्राटदारांना कोट्यवधी रुपयांची कामे दिली असून, मुदत संपत आली तरी अपुर्ण कामे कागदपत्रांवर केली असल्याचे दर्शवून त्यांना देयके अदा केली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर देखील महानगरपालिका प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने वर नमूद केलेल्या सर्व भागांमधील नाल्यांची सफाई तातडीने करणेबाबत तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळातील बसस्थानकांची दुरुस्ती करून अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) * ७९४२८ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट),**

**श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.दादाराव केचे (आर्वी), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी बस स्थानकांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेली असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बस आगारांमध्ये प्रवांशासाठी पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, स्वच्छतागृहाचा अभाव, जीर्ण इमारत, पंखे तसेच बैठक व्यवस्था इत्यादी मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात एसटीचा वापर प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणात करण्यात येत असताना अनेक ठिकाणी कायमस्वरुपी व्यवस्थापकाची नेमणूक करण्यात आलेली नसल्याने आगारातील कामे व्यवस्थितरित्या होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच काही ठिकाणी बस स्थानकांच्या नुतनीकरणासाठी निधी अप्राप्त आहे, तर काही ठिकाणी निधी प्राप्त होवून अखर्चित राहणे, काही ठिकाणी त्या निधीतून केलेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील विविध बस आगारांच्या दुरवस्थेबाबत अनेक स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील बस आगाराचे नुतनीकरण करणे, आवश्यक सोयी-सुविधा व निधी उपलब्ध करुन देणे, निकृष्ट कामांबाबत संबंधित कंत्राटदारांवर कारवाई करणे तसेच या सर्व प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) रा. प. महामंडळाची राज्यात एकुण ५९७ बसस्थानके व २५१ आगार आहेत. बहुतांश बसस्थानके व आगार ३० ते ५० वर्षापुर्वीचे आहेत. त्यामुळे काही जुन्या बसस्थानकांची दुरावस्था झाली असून सोयी सुविधा पुरेशा नाहीत.

(३) रा.प. महामंडळामध्ये एकुण २५० आगारे असुन त्यापैकी एकुण २२६ आगारामध्ये नियमित आगार व्यवस्थापकांची नियुक्ती करण्यात आली आहे. २४ आगारांच्या आगार व्यवस्थापक पदांचा कार्यभार जबाबदार अधिका-यांकडे सोपविलेला आहे.

(४) बसस्थानकांच्या नुतनीकरण्याची कामे शासन निधीची उपब्धता व क्षेत्रीय आवश्यकता यानुसार हाती घेण्यात आली आहेत.

(५) व (६) निवेदन प्राप्त झाले आहे. ज्या कामांची तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, अशा कामांकरीता चौकशी समितीची नेमणूक करुन चौकशी करण्यात येत आहे.

----------------

## मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील साई आझाद सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१९) * ८२३८५ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील के.डी. कम्पाऊंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर साई आझाद सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मुंबईतील कांदिवली (पश्चिम) के.डी.कंपाऊंड येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या साई आझाद सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अनियमितता झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२४.०४.२०२४ रोजी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे तक्रार अर्ज केलेला आहे.

(३) प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने प्रमुख अभियंता (दक्षता) यांच्यामार्फत केलेल्या निरिक्षण अहवालानुसार प्रथम दर्शनी अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार तयार करण्यात आलेले प्रारुप परिशिष्ट-२ दि.१९.०४.२०२४ रोजी रद्द करण्यात आले आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर सदर प्रकरणी चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या रुग्णालय परिसरात मल्टीस्पेशालिटी कॅन्सर रुग्णालय उभारण्याबाबत

**(२०) * ७९८९६ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या संख्येत होणाऱ्या वाढीमुळे गोरगरीब रुग्णांना उपचार घेण्यास खाजगी रुग्णालयामध्ये जावे लागत असून हे उपचार त्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथे महानगरपालिकेच्या थेरगाव रुग्णालय परिसरालगत सुमारे ३५ गुंठे जमिनीवर अद्ययावत सुविधांनी सुसज्ज असे मल्टीस्पेशालिटी कॅन्सर रुग्णालय उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचेकडे दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाचे एक पथक सुरत शहरातील पीपीपी तत्त्वावर सुरु असलेल्या रुग्णालयाची पाहणी करण्यासाठी गेले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी रुग्णालय उभारण्याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कॅन्सर रुग्णालय उभारणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत थेरगांव रुग्णालय येथे पीपीपी तत्वावर कॅन्सर रुग्णालय उभारण्यासाठी निविदा नोटीस क्र.०५/२०२३-२०२४ दि.१२.०३.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली असून कॅन्सर रुग्णालय उभारणेकामी निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळातील बंद पडलेल्या बसेसच्या दुरुस्तीबाबत**

**(२१) * ८०२६३ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात एकूण १५ हजार ७५२ बसेस सेवेत असून त्यापैकी सुमारे तीन हजार बसेस कोणत्या न कोणत्या कारणामुळे आगारात किंवा विभागीय कार्यशाळेमध्ये बंद अवस्थेत उभ्या असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या अपुऱ्या संख्या, कालबाह्य तसेच देखभालीअभावी नादुरुस्त बसेसची सेवा बाधित झाली असून अपघाताच्या संख्येत देखील वाढ होत असून नागरिक, विद्यार्थी, बसेसचे चालक व वाहक यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाने विभागीय स्तरावर १ हजार २९५ तयार बस भाडेतत्वावर घेण्याची निविदा अंतिम टप्प्यात आली असूनही या प्रक्रियेस अद्याप मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या बसेसचे मंडळनिहाय योग्य नियोजन व वाटप करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत नागरिक, विविध संघटना व लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी तक्रारी व आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.

(३), (४) व (५) रा.प.महामंडळ संचालक मंडळाच्या ठरावामध्ये १२९५ साध्या बसेस भाडेतत्वावर घेण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला असून निविदा प्रक्रिया प्रस्तावित आहे.

तसेच प्रत्येक विभागाच्या चालनीय स्थितीनुसार प्रवाशीनिकड व मनुष्यबळ स्थिती विचारात घेऊन मंडळनिहाय बसेसचे नियोजन व वाटप करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवरचे संवर्धन व जतन करण्याबाबत

**(२२) * ८२६८३ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील जागतिक वैभव आणि "रामसर" दर्जा प्राप्त असलेल्या लोणार सरोवरामध्ये प्रक्रिया न केलेल्या नदी नाल्याच्या दुषित सांडपाण्यामुळे सरोवरातील दुर्मिळ जैविक घटकांवर विपरित परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरोवरात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी तब्बल दिड कोटी रुपयांचा प्लॅन्ट बसविण्यात आला असून प्रक्रिया न करताच सरोवरात दूषित पाणी संबंधित अधिकाऱ्यांकडून सोडण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सरोवराच्या पाण्याच्या पातळीत नैसर्गिकरित्या येणाऱ्या पाण्याचे तसेच सांडपाणी सरोवरात सोडण्यात आल्यामुळे सातत्याने वाढ होत असून गेल्या दोन वर्षात सरोवराच्या पाण्याच्या पातळीत २.६९ मिटरने वाढ झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे सरोवराच्या काठाशी असलेली पुरातन मंदिरे देखील या दुषित पाण्याखाली गेली असून मंदिरांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सरोवराची स्वच्छता व निगा राखणेबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), अकोला यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार नदी नाल्याच्या दूषित सांडपाण्यामुळे लोणार सरोवरातील दुर्मिळ जैविक घटकांवर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) मुख्याधिकारी, नगरपरिषद, लोणार यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार दूषित पाणी प्रक्रिया न करता सरोवरात सोडण्यात येत नाही.

(३) विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), अकोला यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार लोणार सरोवराच्या जलाशयामध्ये दोन वर्षामधे झालेली वाढ ही नैसर्गीक वाढ आहे.

(४) हे खरे नाही.

(५) विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), अकोला यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार लोणार वन्यजीव अभयारण्यामध्ये रामसर दर्जा अबाधीत ठेवणे व लोणार सरोवराचे जतन व संवर्धन करणे यानुषंगाने वन्यजीव विभागामार्फत संरक्षण व वन्यजीव व्यवस्थापनाची कामे नियमीतपणे पार पाडण्यात येतात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाटकोपर (मुंबई) येथील छेडानगर भागातील होर्डिंग कोसळून झालेला अपघात

**(२३) * ८२८०५ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विनोद निकोले (डहाणू), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दि.१३ मे, २०२४ रोजी वादळी वाऱ्यामुळे घाटकोपर येथे मोठा जाहिरात फलक पेट्रोल पंपावर कोसळून झालेल्या दुर्घटनेत सुमारे १७ व्यक्ती मृत व १०० व्यक्ती गंभीर जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच दि.१५ मे, २०२४ रोजी पुणे येथील कुरुळीतील बागडेवस्ती (ता.खेड) आणि दि.१६ व १८ मे, २०२४ रोजी मोशी व लोणीकाळभोर (ता.हवेली) येथे देखील होर्डींग कोसळून दुर्घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) राज्यात अनेक ठिकाणी मोठ मोठे जाहिरात फलक अनधिकृत, सुरक्षितता व अटी शर्तींचे उल्लंघन करुन लावण्यात आले असून त्यावर स्थानिक यंत्रणांचे कोणतेही नियंत्रण नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात मोक्याच्या व वर्दळीच्या ठिकाणी जाहिरात फलक उभारताना आकारमान, उंची, वजन, वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा, स्थानिक प्रशासनाचे ना-हरकत प्रमाणपण, जागेच्या मालकीवरुन जबाबदारी टाळणे, निर्णयात एकसुत्रीपणा नसणे, स्टॅक्चरल ऑडीट करणाऱ्या संस्थांच्या प्रमाणपत्राची विश्वासार्हता यासंदर्भात कोणतेही मापदंड/धोरण/कायदेशीर तरतूदी नसल्यामुळे नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त घटनांची शासनाने सखोल चौकशी करुन अनधिकृत व धोकादायक फलक निष्कासित करणे, मृत व जखमींना आर्थिक मदत देणेबाबत तसेच यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) तसेच राज्यातील सर्वच जाहिरात फलकांचे स्टॅक्चरल ऑडीट करुन यासंदर्भात निश्चित धोरण, निकष, मापदंड व कायदेशीर तरतूदी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रात मोशी येथे दि.१६.०५.२०२४ रोजी अवकाळी वादळी वाऱ्याने जाहिरात फलक कोसळण्याची दुर्घटना घडली आहे.
(३) हे खरे नाही.
जाहिरात फलकांना प्रचलित मार्गदर्शक तत्वांनुसार स्थानिक प्राधिकरणांमार्फत परवानगी दिली जाते.
(४) हे खरे नाही.
(५) सदर अपघातात जखमी व्यक्तींपैकी ज्या १३ व्यक्तिंनी ७ दिवसापेक्षा जास्त उपचार घेतले त्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून रु.१६ हजार प्रमाणे व पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधी अंतर्गत प्रत्येकी एकूण रु.२ लक्ष १६ हजार इतके अर्थसहाय्य करण्यात आले आहे. जखमी व्यक्तींपैकी १३ व्यक्तिंनी ७ दिवसापेक्षा कमी उपचार घेतले त्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून रु.५ हजार ४०० प्रमाणे व पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधी अंतर्गत

प्रत्येकी रु.२ लक्ष इतके अर्थसहाय्य करण्यात आले आहे. या अपघात ग्रस्तांपैकी १७ मृत व्यक्तिंच्या वारसांना राज्य शासनाद्वारे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी रु.५ लाख, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून प्रत्येकी रु.४ लाख व पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधी अंतर्गत प्रत्येकी रु.२ लक्ष या प्रमाणे मृत व्यक्तिंच्या वारसांना प्रत्येकी रु.११ लाख इतके अर्थसहाय्य करण्यात आले आहे.

(६) राज्य शासनाने सर्व महानगरपालिकांसाठी (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) दि.९ मे, २०२२ च्या अधिसूचनेनुसार नियमावली निर्गमित केलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी दि.२९.०४.२०२२ च्या शासन निर्णयान्वये व राज्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी दि.२२.०६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत.

-----------------

**नांदेड शहरात ड्रेनेज चेंबरमध्ये उतरलेल्या तीन मजुरांचा गुदमरून मृत्यू झाल्याबाबत**

**(२४) * ७९५९१ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील मालटेकडी भागात गाळ काढण्यासाठी ड्रेनेज चेंबरमध्ये उतरलेल्या तीन मजुरांचा गुदमरून मृत्यू झाल्याची घटना दिनांक ५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील महानगरपालिकेचे मलशुद्धीकरण केंद्र खासगी कंत्राटदारांमार्फत चालवले जात असून, नवीन मशिनरीज उभारण्याच्या कामासाठी कामगारांना ड्रेनेजमध्ये उतरविल्याने तसेच खाजगी कंत्राटदाराने पुरेशी काळजी न घेतल्याने या तीन कामगारांचा मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील महानगरक्षेत्रात अशा घटना वारंवार घडत असल्यामुळे मल शुद्धीकरण केंद्रात काम करणाऱ्या कामगाराच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येणार आहेत काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कारवाई करण्यासह मृत कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत नांदेड शहरातील भुयारी गटार योजनेचे बळकटीकरण व संलग्नीकरण करणे संदर्भात नांदेड शहरातील मालटेकडी भागात नवीन पंपींग मशिनरी बसविण्याच्या कामाकरिता इन्लेट चेंबर बंद करणे आवश्यक असल्याने इन्लेट चेंबर बंद करण्यासाठी दोन मजूर व एक अन्य व्यक्ती दि.०४.०४.२०२४ रोजी इन्लेट चेंबर मध्ये उतरले असता, त्यांचा गुदमरुन अपघाती दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नांदेड शहरातील माळटेकडी भागातील भुयारी गटार योजनेचे बळकटीकरण व संलग्नीकरण करणे संदर्भात मे.शारदा कन्स्ट्रक्शन ॲण्ड कार्पोरेशन, प्रा.लि., नांदेड या कंपनीला तसेच मल: उपसा केंद्राचे (Sewage Pumping Station) दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामासंदर्भात मे.पुजा कन्सट्रक्शन, राजकोट, गुजरात या कंपनीला कार्यारंभ आदेश महानगरपालिकेकडून देण्यात आले.

महानगरपालिका अभियंत्यांच्या तसेच प्रकल्प व्यवस्थापक यांच्या अनुपस्थितीत त्यांना कोणतेही पूर्वकल्पना न देता माळटेकडी येथील मल: उपसा केंद्रामध्ये नवीन पंपिंग मशीनरी उभारण्याच्या कामासाठी

केंद्राजवळील रिकाम्या हौदातील इन्लेट चेंबर बंद करण्यासाठी दि.०४.०४.२०२४ रोजी लेबर कंत्राटदाराने दोन्ही मजूरांच्या कमरेला दोरी बांधून, नाकाला मास्क लावून सदर हौदात उतरविण्यात आल्याचे तसेच अन्य एक व्यक्ती स्वत:हून हौदात उतरल्याबाबतचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) मलशुध्दीकरण केंद्रात काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटना (सी.पी.एच.ई.ई.ओ.) यांनी निर्गमित केलेल्या स्टॅण्र्डड ऑपरेटींग प्रोसिजर (एसओपी) फॉर क्लिनिंग ऑफ सिवर ॲण्ड सेप्टीक टँक नुसार उपाय योजना करण्यात येतात

(४) नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड मार्फत चौकशी समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या निकषाच्या आधारे सदर घटना ही पूर्णत: केवळ अपघाती त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग चे काम नव्हते असा अहवाल सादर केला. तसेच या संदर्भात पोलीस प्रशासनाने फौजदारी प्रक्रीया संहीता कलम १७४ अन्वये अपघाती मृत्यू (ए.डी.) क्र.१४/२०२४ दाखल केले असून तपास सुरु आहे.

सदरच्या अपघाती प्रकरणामध्ये अपघाताची जबाबदारी मे.शारदा कन्स्ट्रक्शन कंपनीची असल्याने कंपनीमार्फत मृत्यू पावलेल्या तिघांच्या कुटूबिंयाना प्रत्येकी रु.२५.०० लक्ष धनादेशाद्वारे मावेजा तसेच महानगरपालिकेतर्फे रु.१०.०० लक्ष इतकी मदत धनादेशाद्वारे देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड नगरपरिषदेला विविध योजना राबविण्याकरीता देण्यात आलेल्या निधीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२५)** * **८२३५२ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषदेला सन २०१९ ते नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत विविध योजनांकरीता प्राप्त झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदारांनी केलेली कामे निकृष्ट दर्जाची असतानाही तसेच काही ठिकाणी जुनीच व अस्तित्वात असलेली कामे नव्याने झाल्याचे केवळ कागदोपत्री दाखवून कंत्राटदारांना दुबार देयके कंत्राटदार व प्रशासनाच्या संगनमताने अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी मा.विधानसभा सदस्य यांना बीड नगरपरिषदेमार्फत सन २०१९ ते २०२३ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध योजनांबाबतची माहिती दि.०८.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे. तसेच सर्व तक्रारींचे नियमोचितरित्या निरसन झाले असल्याबाबत मा.विधानसभा सदस्य यांनी दि.१२.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेस कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माथेरान (जि.रायगड) येथील भूमिपुत्रांना ई-रिक्षा चालविण्यास परवानगी देण्याबाबत

**(२६) * ८१२१३ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (जि.रायगड) येथील नागरिकांच्या मागणीनुसार स्थानिक भूमीपुत्रांची हातरिक्षाच्या पारंपारिक व अमानवी व्यवसायातून सुटका व्हावी म्हणून ई-रिक्षा चालविण्यास द्याव्यात असे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक१० जानेवारी, २०२४ रोजी दिलेले असतांना त्याची अद्याप नगरपालिका प्रशासन, माथेरान तसेच शासन नियुक्त सनियंत्रण समितीने अंमलबजावणी केली नसल्याचे दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन संनियंत्रण समितीची मागील तीन वर्षांत एकही बैठक माथेरान येथे झाली नसून या १० जणांच्या समितीमध्ये कोणीही स्थानिक व्यक्ती सभासद म्हणून घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ई-रिक्षा वाहतुकीअभावी तेथील नागरिक, शालेय विद्यार्थी व मुख्यत्वे पर्यटकांना अत्यंत अडचणीचे ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक नगरपालिका प्रशासन व शासन नियुक्त सनियंत्रण समितीने ई-रिक्षा चालविण्यास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) माथेरान संनियंत्रण समितीच्या दि.०६/०३/२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये २० ई-रिक्षा माथेरान हद्दीत प्रायोगिक तत्वावर १ वर्ष चालविण्यासाठी परवानगी दिली असून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर त्याची अंमलबजावणी करण्यास समितीने मान्यता दिली होती. दि.१५/०४/२०२४ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने हातरिक्षा परवानाधारकांना २० ई-रिक्षा चालविण्यासाठी परवानगी दिली आहे.

(२) केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण विभागाच्या दि.०४/०२/२००३ च्या अधिसूचनेन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार माथेरान संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अनुपालन करण्याकरीता तातडीने बैठका आयोजित करण्यात येत असल्याने या बैठका दूरदृश्यप्रणालीमार्फत आयोजित करण्यात येत होत्या. दि.१६/१०/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये दर तीन बैठकामधून एक बैठक माथेरान येथे नियोजित करण्याचे समितीने निश्चित केले आहे.

(३) माथेरान नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये सुरु असलेल्या ई-रिक्षा प्राधान्याने शालेय विद्यार्थ्यांना शाळेतून ये जा करण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातात. शालेय वेळेनंतर स्थानिक नागरीकांना ई-रिक्षा वाहतुकीसाठी प्राधान्याने उपलब्ध करुन दिल्या जातात.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१५/०४/२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार २० ई-रिक्षा स्थानिक हातरिक्षा परवानाधारकांना चालविण्यासाठी देण्याकरीता दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर सूचना प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार विहित मुदतीत प्राप्त २३ अर्जांमधून सोडत पध्दतीने नोंदणीकृत २० हातरिक्षा चालकांची निवड करण्यात आली असून त्यांचेमार्फत ई-रिक्षा चालविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेत निधीचा झालेला गैरव्यवहार

**(२७) * ८०१७६ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात निधीचा गैरव्यवहार व अनियमितता होत असून दैनंदिन जमाखर्च पाहण्यासाठी शासनाकडून प्रभारी मुख्य लेखापरिक्षकांची नियुक्ती करुनही मागील चार वर्षापासून लेखापरिक्षण अहवाल सादर करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये आग सुरक्षा राखीव निधी आणि निवृत्ती वेतन राखीव निधीतून ६० कोटी अन्य ठिकाणी वळविण्यात आले असून तसेच निविदा पडताळणी समितीने अन्य ११ निविदा प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाल्याने त्या रद्द करण्याची शिफारस केलेली असतानाही यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याची मागणी माजी नगरसेवक श्री.अजित पाटील यांनी मा.उपमुख्यमंत्री महोदय, प्रधान सचिव, नगरविकास विभाग व महानगरपालिका प्रशासन यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उद्याने व मैदाने देखभाल व निगा निविदेतील मंजुरीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व नियमांचे उल्लंघन झाल्याप्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरूध्द चौकशी करून कारवाईची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे माहे सप्टेंबर, २०२३ व नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच कोरोना काळात रुग्णवाहिकेबाबत निविदा न काढता मंजूर दराऐवजी मंजूर नसलेल्या दरांनी आयसीयू वा वातानुकुलीत रुग्णवाहिका मर्जीतील ठेकेदारांना भाड्याने देऊन तसेच प्रत्येक फेऱ्यास किमान १० कि.मी. प्रमाणे भाडे आकारून संगनमताने गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) कोव्हीड-१९ नियंत्रणात आणण्यासाठी केलेला खर्च, शहरी गरीबांना मुलभूत सेवा (BSUP) योजना पूर्ण करण्यासाठी केलेला खर्च व काही तातडीची विकास कामे करण्यासाठी केलेला खर्च भागविण्यासाठी अग्निशमन दलाचा निधी प्रतीपूर्ती अधीन वापरण्यात आला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तातडीची बाब म्हणून केलेला उक्त खर्च आवश्यक तेवढा निधी उपलब्ध झाल्यानंतर अग्निशमन निधीमध्ये वर्ग करण्यात यावा, असा प्रशासकीय ठराव पारीत आहे.

निविदा परिक्षण समितीने शिफारस केल्यानुसार १८ निविदा रद्द केल्या असून, त्यानंतर महानगरपालिकेमार्फत फेर निविदा राबविण्यात आली आहे.

(३) अशा आशयाचे निवदेन माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(४) अशा आशयाचे निवदेन माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(५) कोव्हीड-१९ कालावधीमध्ये रूग्णवाहीका तातडीने उपलब्ध करणे गरजेचे होते. सदर कालावधीमध्ये शासकीय दराने रूग्णवाहिका पुरवठा करण्यास पुरवठादार तयार नसल्याने त्यावेळी उपलब्ध पुरवठादाराने दिलेला दराचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(३)(क) व आपत्ती व्यवस्थापन कायदा,

२००५ यामधील तरतूदीनुसार प्राप्त अधिकारान्वये आयुक्तांमार्फत तातडीची बाब म्हणून स्विकारण्यात आला आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दिवा (जि.ठाणे) येथील साबे गावात असलेली खारफुटी नष्ट करुन भराव टाकण्यात येत असल्याबाबत**

**(२८) * ७९८८० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा (जि.ठाणे) येथील साबे गावात असलेली कांदळवने / खारफुटी अवैधरित्या नष्ट करून त्या जागेवर भूमाफियांकडून भराव टाकून बेकायदेशीरपणे खाडी बूजवून अनधिकृत झोपड्या उभारण्याचे काम सुरू असून सदर काम त्वरित थांबविण्याकरिता तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा येथील ग्रामस्थांनी दिनांक २७ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकसभा निवडणूकीच्या कामात शासकीय अधिकारी, कर्मचारी व्यस्त असल्याचा फायदा घेत मुंब्रा व दिवा येथील खाडीत अवैधरित्या भराव टाकण्याचे काम जोरात सुरू असून प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने हा परिसर सीआरझेडमध्ये समाविष्ट असल्याचे घोषित केले असतानाही या ठिकाणी खारफुटीच्या जागेवर बेकायदेशीर भराव टाकल्यामुळे पावसाळ्यात मुंब्रा, दिवा व साबे गाव पाण्याखाली बुडण्याची शक्यता असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधीनी पत्रव्यवहाराद्वारे प्रशासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त परिसरांतील कांदळवनाचे संरक्षण करणे, अवैधरित्या टाकण्यात येणारा भराव रोखणे व अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत तसेच यास जबाबदार भूमाफिया व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) ठाणे जिल्ह्यातील साबे गाव परिसरात कांदळवने नष्ट करुन भराव टाकून बांधकाम केल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, वन विभागाने कळविल्यानुसार त्यांच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रावर अतिक्रमण / अनियमितता झालेली नाही. ठाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या सार्वजनिक क्षेत्रात कांदळवन नसल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे. मुंब्रा-दिवा येथील खाडीचा व लगतचा कांदळवन परिसर हा सी.आर.झेड. क्षेत्रामध्ये येतो.

तसेच वन विभागाच्या ताब्या व्यतिरिक्त खाजगी कांदळवन क्षेत्र, बफरझोन व इतर महसुल विभागाच्या ताब्यामधील क्षेत्रावरील कांदळवनाचा ऱ्हास, भराव, बांधकाम इ. बाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने पर्यावरण (संरक्षण अधिनियम), १९८६ अंतर्गत कार्यवाही आवश्यक असल्याने याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना सूचित करण्यात आल्याची बाब महसुल व वन विभागामार्फत कळविण्यात आली आहे.

सदर प्रकरणी महसुल व वन विभाग यांच्या दिनांक १९.१२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सागरतटीय जिल्ह्यातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. प्रस्तुत विषयी उक्त मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याच्या सूचना संबंधित विभागास देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगपालिकेतील रिक्त पदे भरण्यासह औषधपुरवठा सुरु करण्याबाबत

**(२९) * ७९४६० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील वर्ग ‘अ’ ते ‘ड’ पर्यंत २०६७ इतकी पदे मंजूर असताना केवळ १ हजार ८१ म्हणजेच ५२% पदे भरलेली असून, महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये क्षयरोग, धनुर्वात यासह इंजेक्शन व औषधांचा तुटवडा निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकीकडे केंद्र शासनाकडून औषधे न मिळाल्याचे कारण सांगण्यात येत असतानाच दुसरीकडे मात्र केंद्र शासनाकडून पुणे महानगरपालिकेस गत चार वर्षात मिळालेल्या निधीपैकी ५०% निधी सुध्दा खर्च झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रुग्ण कल्याणाचे निर्णय घेण्याकरिता ५४ ठिकाणी रुग्ण कल्याण समित्यांना मंजुरी असतांना केवळ २३ ठिकाणीच रुग्ण कल्याण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी अनेक कष्टकरी पंचायतींनी पुणे महानगरपालिकेतील आरोग्य प्रमुखांकडे निवेदन देऊन तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरणे, सर्व रुग्ण कल्याण समितींची स्थापना करणे, इंजेक्शन व औषधांचा पुरवठा सुरळीत करणेबाबत तसेच यात दिरंगाई करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

१. पुणे महानगरपालिकेतील आरोग्य विभागात कायम १३४६ व कंत्राटी तत्वावरील ८७८ कार्यरत आहेत.
२. पुणे महानगरपालिकेमार्फत खरेदी प्रक्रिया राबवून क्षयरोग व धनुर्वात यासाठी औषधे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(२) सन २०२३-२४ मधील औषधांकरिता मिळालेला निधी पूर्ण खर्च करण्यात आला आहे. सन २०२४-२५ मधील केंद्र शासनाकडून मिळालेल्या निधीतून औषधे खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयामध्ये रुग्ण कल्याण समिती नोंदणीचे काम केले जाते २३ ठिकाणी रुग्ण कल्याण समित्या स्थापन करण्यात आल्या असून उर्वरित ३१ ठिकाणी रुग्ण कल्याण समिती स्थापन करण्यासाठी वकिलांची नेमणूक करण्यात आली असून त्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे डोंगरे (ता.वसई, जि.पालघर) येथील महानगरपालिका व सिडकोतील अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३०) * ८३४९४ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंगरे (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं. १०७ हिस्सा नं.१ या जमीन मिळकतीबाबत वसई-विरार महानगरपालिकेतील अधिकारी व सिडको अधिकारी श्री.राकेशकुमार वाधवान यांनी संगनमताने एफसीआय व एचडीआयएलमध्ये मोठ्या प्रमाणात शेकडो एकर जमिनीचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी श्री.जितेश हरिश्चंद्र राऊत यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांच्याकडे दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अशा स्वरुपाची तक्रार शासन स्तरावर प्राप्त झाली असून पुढील कार्यवाहीस्तव महानगरपालिकेस सूचित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार मौजे डोंगरे, चिखल डोंगरे, बोंळीज येथील तत्कालीन नियोजन प्राधिकारी, सिडको यांनी सन २००९ मध्ये विकास परवानगी VP-०८८० अंतर्गत अभिन्यास मंजुर करुन संपुर्ण प्रस्तावाची बांधकाम परवानगी अदा केली आहे. तदनंतर वेळोवेळी महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या प्रस्तावाकरीता सुधारीत बांधकाम परवानगी महानगरपालिका स्तरावर देण्यात आले आहे. तथापि, उल्लेखीत मौजे डोंगरे, सं.न.१०७, हि.नं. १ हा उक्त विकास परवानगीचा भाग आहे.

दरम्यानच्या काळात सदर भूखंडावर तक्रारदारामार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झाला असता सदर प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत फेटाळण्यात आला आहे. तसेच VP-०८८० अंतर्गत एफ.एस.आय. ३३५५०३.५९ चौ.मि. वर सीमित करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत मंजुर अभिन्यास सुधारीत करणे तसेच प्रस्तावातील भूखंडाकरीता दाखल विकास प्रस्तावांना परवानगी द्यावी किंवा कसे या अनुषंगाने मार्गदर्शनासाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर सद्यस्थितीत शासन स्तरावर नियमानुसार कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेतील हद्दीत निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांच्या कामाची देयके काढून केलेला गैरव्यवहार

**(३१) * ८०००६ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका हद्दीत कोट्यवधी रुपयांची डांबरी व सिमेंट रस्त्यांची कंत्राटदारांनी केलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी रस्त्यांच्या कामाचा दर्जा व गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण झाल्याने माहे जानेवारी, २०२२ ते २०२३ या कालावधीत आलेल्या ४४ तक्रारींची कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे (सी.ओ.ई.पी.) यांच्या वतीने रस्त्यांच्या कामांची पाहणी करुन ६ महिन्यांपूर्वी चौकशी अहवाल आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडील दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवालात रस्त्याच्या कामामध्ये अनेक त्रुटी असून कामे निकृष्ट दर्जाची असतानाही प्रशासनाच्या संगनमताने कंत्राटदाराने कोट्यवधी रुपयांची बोगस देयके काढल्याबाबत कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता व ठेकेदारांवरही चौकशी अहवालात ठपका ठेवण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रस्ते, पूल, इमारत, बंधारे व शासकीय बांधकामाची शासनाच्या दक्षता व गुणनियंत्रण प्रयोगशाळेतून बांधकाम साहित्याची तपासणी करणे सक्तीचे असतानाही पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या रस्त्याच्या कामातील कंत्राटदाराने प्रयोगशाळेत दिलेले साहित्य व प्रत्यक्षात बांधकामात वापरलेल्या साहित्यात मोठ्या प्रमाणात तफावत असल्याची माहिती सदरहू अहवालात आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन निकृष्ट दर्जाच्या कामांची दुरुस्ती करणेबाबत तसेच कंत्राटदारावर व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील काही कामांचा आलेला स्विकृत निविदा दर हा ४० % पेक्षा कमी दराने आल्यामुळे सदर कामांपैकी पंधरा कामांचे गुणवत्ता व दर्जा तपासणी कामी महापालिकेमार्फत Third Party Inspection साठी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे (सी.ओ.ई.पी.) यांचेकडे देण्यात आलेली होती. सदर कामांची तपासणी करुन त्याचे अहवाल महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहेत.
(३) अंशत: खरे आहे.
कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे (सी.ओ.ई.पी.) यांचेकडील अहवालामध्ये काही कामांमध्ये त्रुटी आढळून आल्याचे तसेच काही ठिकाणी कामांची ठेकेदाराकडून दुरुस्ती किंवा सदरची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करुन घेण्याबाबत नमूद केलेले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे (सी.ओ.ई.पी.) यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत असून संबंधित ठेकेदाराकडून योग्य ती दुरूस्ती अथवा वसुली तसेच कोणी ठेकेदार/कर्मचारी/अधिकारी दोषी आढळून आल्यास त्यावर कारवाई करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे ऑडीट करण्याबाबत

**(३२) * ८०००३ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील उच्चभ्रू वसाहती, गृहरचना संस्था, व्यापारी संकुले, उद्योगधंदे व झोपडपट्टीतील नागरिकांना पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली असल्याने पाण्याचे टँकर भाडेतत्त्वावर मागविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी महानगरपालिकेच्या केंद्रावरून टँकरने पाणीपुरवठा केला जात असताना प्रत्यक्षात किती टँकरद्वारे पाणी पुरवठा केल्याच्या हिशोबाचा ताळमेळ जुळत नसून संबंधित अधिकाऱ्यांकडून पाणी पुरवठा विभागाला माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी ४० टक्के पाणी गळती व पाण्याची चोरी होत असतांना देखील अनधिकृतपणे पाणी विक्री करणाऱ्या टँकर लॉबीच्या फायद्यासाठी संबंधित अधिकारी व दलालांच्या संगनमताने कृत्रिमरित्या पाणी टंचाई निर्माण करुन नागरिकांना पाणी विकले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेच्या टाकीतील पाणी भरणा करुन उपरोक्त सोसायटीधारकांना ठेकेदार पाणी विकत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड पडत असल्याने सर्व खाजगी व मनपाच्या टँकरच्या पाण्याचे ऑडीट व मनपाने भाडेतत्त्वावर घेतलेल्या टॅकरला जी.पी.एस. सिस्टिम लावण्यासह संबंधित टँकरमाफिया ठेकेदार व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.